हॉकी संघाच्या 'भगव्या' जर्सीवरून वाद

बदलापूर्वी आमच्याशी चर्चा नाही; खेळाडूंचा दावा

एक्स्प्रेस वृत्त

मुंबई : भारतीय पुरुष आणि महिला हॉकी संघ पुढील महिन्यात नेदरलँड्स आणि बेल्जियममध्ये होणाऱ्या विश्वचषक स्पर्धेत पारंपरिक निळ्या जर्सीऐवजी भगव्या रंगाच्या जर्सीत खेळताना दिसणार आहेत. या निर्णयावर माजी खेळाडूंनी नाराजी व्यक्त केली आहे, तर 'हॉकी इंडिया'ने (एचआय) हा बदल तांत्रिक कारणांसाठी करण्यात आल्याचे सांगितले आहे. दरम्यान, विद्यमान संघातील खेळाडूंनी मात्र आम्हाला या बदलाबाबत काहीही माहिती नव्हती, असा दावा केला आहे.

भारतीय हॉकी संघाने १९२८ पासून प्रमुख आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये विविध छटांतील निळी किंवा पांढरी जर्सी परिधान केली आहे. मात्र, पुढील महिन्यापासून ही परंपरा बदलणार आहे. ''आंतरराष्ट्रीय हॉकी मैदानांचा सिंथेटिक पृष्ठभाग आता निळ्या रंगाचा असतो. निळ्या रंगाची जर्सी आणि मैदानाचा रंग एकसारखा असल्याने खेळाडूंना चेंडू व सहकाऱ्यांची ओळख पटवताना अडचण येत होती,'' असे 'हॉकी इंडिया'ने आपल्या निवेदनात म्हटले आहे. तसेच हा निर्णय खेळाडू आणि साहाय्यक कर्मचाऱ्यांशी सविस्तर चर्चा करून घेतल्याचा दावाही त्यांनी केला आहे.

मात्र, 'द इंडियन एक्स्प्रेस'ने पुरुष आणि महिला संघातील पाच खेळाडूंशी संवाद साधला असता, सर्वांनीच या प्रक्रियेत आपला सहभाग नसल्याचे सांगितले. ''मला कुणी विचारले नाही किंवा सल्लाही घेतला नाही. हा दावा खरा नाही,'' असे एका खेळाडूने नाव न जाहीर करण्याच्या अटीवर सांगितले. त्यांनी संपूर्ण संघाच्या वतीने बोलत नसल्याचे स्पष्ट केले असले, तरी सर्वांची भूमिका एकसारखीच होती.

याशिवाय, हॉकी इंडियाच्या कार्यकारी समितीतील काही वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनाही या निर्णयाची माहिती नव्हती, अशी माहिती समोर आली आहे. ''जर्सीचा रंग बदलण्याबाबत मला कोणतीही माहिती नव्हती. या विषयावर झालेल्या कोणत्याही अधिकृत बैठकीत मी सहभागी नव्हतो,'' असे एका कार्यकारी समिती सदस्याने सांगितले.

जर्सीचा रंग बदलण्याचा अंतिम निर्णय नेमका कुणी घेतला, याबाबत विचारले असता 'हॉकी इंडिया'ने भाष्य करण्यास नकार दिला. नव्या जर्सीमध्ये बाही आणि कॉलरजवळ निळ्या रंगाची किनार असून खांद्यापासून खाली तिरंग्याच्या रंगांची बारीक पट्टी देण्यात आली आहे.

अनेक दशकांची परंपरा

भारतीय क्रीडा क्षेत्रात निळ्या रंगाला अनेक दशकांची परंपरा लाभली आहे. क्रिकेट संघ 'मेन इन ब्ल्यू' आणि 'वूमन इन ब्ल्यू' या नावाने ओळखले जातात. हॉकी संघानेही ऑलिम्पिक आणि विश्वचषक स्पर्धांमध्ये सातत्याने निळी जर्सी परिधान केली आहे. केवळ २०१४ मध्ये प्रायोजकांच्या करारामुळे भारतीय संघाने पिवळ्या रंगाची जर्सी वापरली होती. हॉकी इतिहासाचे अभ्यासक के. अरुमुगम यांनी सांगितले की, ''१९२८ मध्ये भारताने ऑलिम्पिकमध्ये पदार्पण केल्यापासून भारतीय संघाने प्रामुख्याने निळ्या किंवा पांढऱ्या रंगाची जर्सीच परिधान केली आहे. १९९४-९५ दरम्यान प्रायोजकांच्या सूचनेनुसार जर्सीच्या डिझाइनमध्ये बदल झाले, मात्र रंगात फारसा बदल झाला नव्हता.''

दरम्यान, सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेतही भारतीय हॉकी संघ हीच भगवी जर्सी वापरणार का, याबाबत विचारले असता हॉकी इंडियाने कोणतीही प्रतिक्रिया देण्यास नकार दिला. विशेष म्हणजे, त्या स्पर्धेत भारतीय पथकातील इतर सर्व खेळाडू पारंपरिक निळ्या रंगाच्या गणवेशात दिसणार आहेत.



माजी खेळाडूंची नाराजी

- दिग्गज हॉकीपटू धनराज पिल्ले, माजी कर्णधार वीरेन रस्किन्हा यांसह अन्यही काही माजी खेळाडूंनी जर्सीचा रंग बदलण्याच्या निर्णयाला विरोध दर्शवला आहे.
- "भगवा रंग आपल्या राष्ट्रध्वजाचा भाग असून हा रंगही महत्त्वाचा आहेच. परंतु हा रंग भारतीय हॉकी कधीही जोडलेला नव्हता. त्यामुळे इतक्या वर्षांची परंपरा मोडून जर्सीचा रंग बदलण्याची काय गरज पडली, हे मला कळले नाही," असे धनराज म्हणाले.
- रस्किन्हाने जर्सीचा रंग बदलण्याचा निर्णय 'लाजिरवाणा' असल्याचे म्हटले आहे. "हॉकी इंडियाने अनेक चांगली कामे केली आहेत. मात्र, हा निर्णय निराशाजनक आहे. भारतीय संघाची ओळख आणि परंपरा नेहमीच निळ्या जर्सीशी जोडलेली आहे. चाहत्यांना भारतीय संघाला निळ्या रंगात पाहायची सवय आहे. मग भगव्या रंगामागचे तर्क काय ?" असा सवाल रस्किन्हाने उपस्थित केला.

'संयमी' पर्वाची अखेर



माजी कसोटी कर्णधार अजिंक्य रहाणेची निवृत्ती

वृत्तसंस्था, मुंबई

लढवय्या क्रिकेटपटू, जवळपास दशकभर भारतीय कसोटी संघाचा 'संकटमोचक' म्हणून लौकिक राखलेला माजी कर्णधार अजिंक्य रहाणे याने सर्वप्रकारच्या क्रिकेटमधून निवृत्तीची घोषणा गुरुवारी केली. अतिशय शांत व संयमी व्यक्तिमत्वासाठी ओळखल्या जाणाऱ्या रहाणेने ८५ कसोटी, ९० एकदिवसीय आणि २० ट्वेन्टी-२० सामन्यांत भारताचे प्रतिनिधित्व केले. २०२०-२१च्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर अनुभवी खेळाडूंच्या अनुपस्थितीत भारतीय संघाला आपल्या नेतृत्वाखाली कसोटी मालिकेत ऐतिहासिक विजय मिळवून देणे हा रहाणेच्या कारकीर्दीतील सर्वोच्च बिंदू ठरला. गेल्या काही काळापासून तो राष्ट्रीय संघातून बाहेर होता. त्यामुळे आता थांबण्याची, आयुष्यात पुढे जाण्याची ही योग्य वेळ असल्याचे म्हणत ३८ वर्षीय रहाणेने निवृत्ती जाहीर केली.

''प्रत्येक सुरुवातीचा एक शेवट असतो, हे जीवनातील सत्य आहे. जेव्हा वेळ येते, तेव्हा तिचा आदर करून पुढे निघून जायचे असते. मी फलंदाजी करताना नेहमीच 'टायमिंग'वर विश्वास ठेवला आणि त्याचे महत्त्व मला माहीत आहे. आता पुढे जाण्याची योग्य वेळ आली असून, मी आंतरराष्ट्रीय क्रिकेट आणि सर्व प्रारूपांतून निवृत्ती घेत आहे,'' असे रहाणे इन्स्टाग्रामवरील ध्वनीचित्रफितीत म्हणाला.

देशांतर्गत क्रिकेटमध्ये मुंबईसाठी चमकदार कामगिरी केल्यानंतर रहाणेला २०१३ मध्ये आंतराष्ट्रीय पदार्पणाची संधी मिळाली. तो जवळपास दशकभर भारतीय संघाचा भाग राहिला. विशेषतः परदेशात त्याने उत्कृष्ट कामगिरी केली. मात्र, २०२३ मध्ये वेस्ट इंडिजमध्ये झालेल्या कसोटी मालिकेनंतर तो भारताकडून खेळलेला नाही.

रहाणेसाठी २०२०-२१चा ऑस्ट्रेलिया दौरा संस्मरणीय ठरला. नियमित कर्णधार विराट कोहलीच्या अनुपस्थितीत त्याने अनेक आघाडीच्या खेळाडूंविना संघाचे नेतृत्व केले आणि ऑस्ट्रेलियाला त्यांच्या घरच्या मैदानांवर नमवत भारताला बॉर्डर-गावस्कर करंडक २-१ असा जिंकून दिला. ॲडलेडमधील पहिली कसोटी गमावल्यानंतर कोहली पितृत्व रजेसाठी भारतात परतला होता. त्या सामन्यात भारतीय संघ दुसऱ्या डावात अवघ्या ३६ धावांत गारद झाला. त्यानंतर कोहली, जसप्रीत बुमरा, रवींद्र जडेजा असे आघाडीचे खेळाडू विविध कारणांनी संघाबाहेर होत गेले. मात्र, रहाणेच्या कुशल नेतृत्वाखाली भारताने मालिका जिंकली. दुसऱ्या कसोटीत रहाणेने ऑस्ट्रेलियाच्या वेगवान गोलंदाजांचा समर्थपणे सामना करत २२३ चेंडूंत ११२ धावा केल्या. मेलबर्न कसोटीत भारताने आठ गडी राखून जिंकत मालिकेत बरोबरी साधली. त्यानंतर गॅबा येथे अखेरची कसोटी तीन गडी राखून जिंकत भारताने मालिका विजय साकारला.

''सुरुवातीला सरावासाठी डोंबिवलीहून रेल्वेने प्रवास करण्याच्या दिवसांपासून आजपर्यंत मी क्रिकेटला सर्व काही दिले. प्रत्येक दिवस, प्रत्येक डाव आणि प्रत्येक क्षणी भारतासाठी खेळण्याचेच माझे स्वप्न होते. मी नेहमीच संघ आणि देशाला प्राधान्य दिले. मी प्रामाणिकपणे क्रिकेट खेळलो. प्रथमश्रेणी क्रिकेटमध्ये पदार्पण केल्यापासून आजपर्यंत भारतीय क्रिकेटने मोठी प्रगती केली आहे. गेली २० वर्षे त्या प्रवासाचा भाग असल्याचा मला अभिमान आहे. भारतीय क्रिकेटमधील माझा अध्याय संपत असला, तरी क्रिकेटबरोबर माझे नाते संपणार नाही. मला पुढच्या पिढीला मदत करायची आहे. क्रिकेटकडून मला जे काही मिळाले, ते त्यांना देण्याचा माझा प्रयत्न राहील,'' असे रहाणे म्हणाला.

'आयपीएल'मध्ये रहाणेने मुंबई इंडियन्स, राजस्थान रॉयल्स, रायझिंग पुणे सुपरजायंट्स, दिल्ली कॅपिटल्स, चेन्नई सुपर किंग्ज आणि कोलकाता नाइट रायडर्सचे प्रतिनिधित्व केले. रहाणेने २०२४-२५ हंगामात मुंबईचे नेतृत्व केले. त्याच्या नेतृत्वाखाली मुंबईने २०२३-२४ हंगामात रणजी करंडकावर नाव कोरले.

चाहत्यांचे विशेष आभार

निवृत्ती जाहीर करताना रहाणेने चाहत्यांचे विशेष आभार मानले. "अजिंक्य'चा अर्थ ज्याला पराभूत करता येत नाही असा होतो. मात्र, क्रिकेटने मला पराभवाचाही अनुभव दिला. क्रिकेटपटू म्हणून यशापेक्षा अपयशाचे क्षण अधिक पाहिले. माझा संघ सामने हरला, माझ्याकडूनही चुका झाल्या. मात्र, एक ठिकाणी मी कधीच पराभूत झालो नाही. ते म्हणजे तुमच्या हृदयात. तुम्ही मला आपले मानून भरभरून प्रेम दिले. त्या विश्वासासाठी धन्यवाद. कॅप क्रमांक २७८ आता निवृत्त होत आहे," असे रहाणेने चाहत्यांना उद्देशून म्हटले.

आंतरराष्ट्रीय कारकीर्द

प्रारूप	सामने	सरासरी	धावा	शतक	अर्धशतक	सर्वोच्च
कसोटी	८५	३८.९६	५०७७	१२	२६	१८८
एकदिवसीय	९०	३५.२६	२९६२	३	२४	९९९
ट्वेन्टी-२०	२०	२०.८३	३७५	-	१	६१

'लोकसत्ता गप्पा'मध्ये आठवणींना उजाळा

२०२०-२१च्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यात मिळवलेल्या ऐतिहासिक यशाच्या आठवणींना रहाणेने 'लोकसत्ता गप्पा' कार्यक्रमात उजाळा दिला होता. "त्यावेळी करोनाचा काळ सुरू होता. ऑस्ट्रेलिया गाठल्यावर आम्हाला १४ दिवस विलगीकरणात ठेवण्यात आले होते. सिडनी कसोटीनंतर आम्ही ब्रिस्बेनला गेलो. दौऱ्यातील अखेरचे सात दिवस आहेत. आपण आतापर्यंत खूप छान क्रिकेट खेळले आहे, असा माझा खेळाडूंना संदेश होता. सर्व खेळाडूंना मैदानावर आणि बाहेरही पूर्ण मोकळीक देण्याचा माझा प्रयत्न होता. शुभमन गिल आणि ऋषभ पंत पहिल्या कसोटीत खेळले नव्हते. त्यांनी अखेरच्या (ब्रिस्बेन) कसोटीत ज्या खेळी केल्या, त्यामुळे सामन्याला कलाटणी मिळाली," असे रहाणेने सांगितले होते. क्रिकेटप्रमाणेच शेती, माती, शेतकरी यांच्याविषयी मला विलक्षण जिव्हाळा वाटतो, असेही त्याने या मुलाखतीदरम्यान सांगितले होते.

दिग्गजांकडून अभिनंदन

अजिंक्य, मुंबईकडून आपण पहिल्यांदा एकत्र फलंदाजी केली, तेव्हाच मला जाणवले की तू कधीही क्षणांच्या मोहात अडकणारा खेळाडू नाहीस. उलट, संघासाठी कठोर परिश्रम करण्याची तुझी तयारीच मोठे क्षण तुझ्याकडे घेऊन आली. ऑस्ट्रेलियातील तुझी खेळी ही त्याच वृत्तीचे सर्वोत्तम उदाहरण ठरली. संयम हा आक्रमकतेच्या विरुद्ध नसतो, तर अनेकदा तोच संघाला निर्भयपणे खेळण्याचा आत्मविश्वास देतो, हे तू सिद्ध करून दाखवलेस. शानदार कारकीर्दीबद्दल मनःपूर्वक अभिनंदन. तुला आणि तुझ्या कुटुंबीयांना पुढील आयुष्यासाठी हार्दिक शुभेच्छा. - सचिन तेंडुलकर

जिंक्स, तुझ्या शानदार कारकीर्दीसाठी मनःपूर्वक अभिनंदन, मित्रा. भारतीय क्रिकेटसाठी तू दिलेले योगदान अतुलनीय आहे आणि तुझ्या या प्रवासाचा तुला नक्कीच अभिमान वाटला पाहिजे. स्लीपमध्ये सर्वांत सुरक्षित हात आणि कसोटी क्रिकेटमधील माझा सर्वांत आवडता फलंदाजीचा जोडीदार. तुझ्या पुढील आयुष्यासाठी खूप शुभेच्छा. - विराट कोहली

आपण अनेक वर्षे ड्रेसिंग रूममध्ये एकत्र होतो. मैदानावर आणि मैदानाबाहेर तू निर्माण केलेले स्नेहसंबंध आणि आठवणी सदैव जिवंत राहतील. आयुष्यातील पुढील टप्प्यासाठी तुला आणि तुझ्या कुटुंबाला खूप खूप शुभेच्छा. - चेतेश्वर पुजारा

मुंबई क्रिकेटमधील अजिंक्य रहाणेचे योगदान केवळ आकडेवारीपुरते मर्यादित नाही. मुंबईला ४२वे रणजी करंडक विजेतेपद मिळवून देण्यात त्याने बजावलेली भूमिका हा आमच्या संघटनेसाठी अभिमानाचा क्षण होता. त्याचा वारसा पुढील पिढ्यांना सदैव प्रेरणा देत राहील. - अजिंक्य नाईक, अध्यक्ष, मुंबई क्रिकेट संघटना

इंग्लंड कसोटी संघाच्या प्रशिक्षकपदी स्टीफन फ्लेमिंग

लंडन : न्यूझीलंडचा माजी कर्णधार स्टीफन फ्लेमिंग याची इंग्लंडच्या कसोटी क्रिकेट संघाच्या प्रशिक्षकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच बेन स्टोक्सच्या निवृत्तीनंतर नेतृत्वाची धुरा पुन्हा जो रूटकडे सोपवण्यात आली आहे. विशेष म्हणजे, स्टोक्सच्या आधी रूटच इंग्लंडचा कर्णधार होता.

ऑस्ट्रेलियाकडून ॲशेस मालिकेत १-४ आणि गेल्या महिन्यात न्यूझीलंडकडून १-२ अशा मालिका पराभवानंतर ब्रेंडन मॅककलम याला इंग्लंडच्या कसोटी संघाच्या प्रशिक्षकपदावरून हटविण्यात आले. मॅककलमकडे एकदिवसीय आणि ट्वेन्टी-२० संघांचे प्रशिक्षकपद कायम आहे. मात्र, कसोटी क्रिकेटमध्ये मॅककलमचा न्यूझीलंड संघातील माजी सहकारी फ्लेमिंग आता इंग्लंड संघाला मार्गदर्शन करेल.

फ्लेमिंग पाकिस्तानविरुद्ध होणाऱ्या तीन कसोटी सामन्यांच्या मालिकेनंतर जबाबदारी सांभाळेल. ही मालिका १९ ऑगस्टला लीड्स येथे सुरू होणार आहे. या मालिकेत मार्कस ट्रेसकॉथिक इंग्लंड संघाला मार्गदर्शन करेल. इंग्लंडचा मुख्य प्रशिक्षक म्हणून फ्लेमिंगची पहिली मालिका डिसेंबर-जानेवारी या कालावधीत दक्षिण आफ्रिकेविरुद्धची असेल. फ्लेमिंगने २००९ ते २०२६ या कालावधीत 'आयपीएल' संघ चेन्नई सुपर किंग्जचे प्रशिक्षकपद भूषवले. या कालावधीत चेन्नईने विक्रमी पाच जेतेपद मिळवले.

ब्राझील-भारत मैत्रीपूर्ण लढत कोलकात्यात

कोलकाता : फुटबॉलविश्वातील सर्वांत बलाढ्य संघांमध्ये गणना होणारा ब्राझीलचा संघ आंतरराष्ट्रीय मैत्रीपूर्ण सामना खेळण्यासाठी भारतात येणार आहे. पाच वेळचा विश्वचषक विजेता ब्राझील आणि भारत यांच्यातील हा सामना तीन ऑक्टोबरला कोलकाताच्या सॉल्ट लेक स्टेडियममध्ये खेळवला जाणार आहे.

अखिल भारतीय फुटबॉल महासंघ (एआयएफएफ) आणि ब्राझील फुटबॉल महासंघाने या सामन्याबाबत अधिकृत घोषणा गुरुवारी केली. ''तीन ऑक्टोबरला सॉल्ट लेक स्टेडियममध्ये भारत आणि ब्राझील 'फिफा' आंतरराष्ट्रीय सामना होईल,'' असे 'एआयएफएफ'ने सांगितले. 'फिफा' क्रमवारीत ब्राझील संघ सध्या पाचव्या स्थानावर आहे. क्रमवारीला सुरू झाल्यापासून (१९९२ पासून) भारतीय संघाने याहून वरच्या स्थानी असलेल्या संघाविरुद्ध सामना खेळलेला नाही.

कर्णधार मार्किन्योसच्या नेतृत्वाखालील ब्राझीलचा संघ ऑस्ट्रेलियाविरुद्ध क्वीन्सलँडमध्ये २५ आणि २९ सप्टेंबरला दोन मैत्रीपूर्ण सामने खेळून भारतात येणार आहे. कोलकातामध्ये ब्राझील संघ लोकप्रिय आहे. २४ सप्टेंबर १९७७ मध्ये महान खेळाडू पेले यांचा संघ न्यूयॉर्क कॉसमॉसने इडन गार्डन्समध्ये मोहन बागानविरुद्ध मैत्रीपूर्ण सामना खेळला होता. ही लढत २-२ अशी बरोबरीत राहिली होती. कोलकातामध्ये यापूर्वी अनेक आंतरराष्ट्रीय फुटबॉल दिग्गजांनी उपस्थिती लावली आहे. जर्मनीचा क्लब बायर्न म्युनिकने मोहन बागानविरुद्ध २००८ मध्ये सामना खेळला होता.

वीरमाता जिजाबाई तंत्रज्ञान संस्था (VJTI)
माटुंगा, मुंबई - ४०० ०१९

निविदा सूचना

""एम.पी.ए. (M P A) कॉम्प्लेक्सच्या सीमेवर तात्पुरते बॅरिकेडिंग उभारणे आणि त्याची देखभाल करणे." या कामासाठी संबंधित अनुभव असलेल्या कंत्राटदारांकडून/संस्थांकडून निविदा मागविण्यात येत आहेत.
निविदा दस्तऐवज आणि संबंधित माहिती www.vjti.ac.in आणि https://mahatenders.gov.in या संकेतस्थळांवर उपलब्ध आहे.
निविदा सादर करण्याची अंतिम तारीख १४ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत आहे.

सही/-
प्रबंधक

महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा)
(महाराष्ट्र शासनाची संस्था)
विभागीय कार्यालय, अमरावती
विभागीय क्रिडा संकुल, मोर्शी रोड, अमरावती - 444603
दुरध्वनी क्र. 0721-2661610 e-mail:dgmamravati@mahaurja.com

ई-निविदा सूचना

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण), सन 2025-26 अंतर्गत निवासी उपजिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा व भुसंपादन इमारत, जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे एकुण 100 कि.वॅ. (50 कि.वॅ. + 50 कि.वॅ.) क्षमतेचे पारेषण संलग्न सौर विद्युत निर्मिती प्रकल्प (नेट मिटरींगसह) आस्थापित व कार्यान्वित करण्याकरीता सर्वेक्षण, पुरवठा, आस्थापना, चाचणी तसेच दुरःस्थ निगराणी प्रणाली व नक्त मापन प्रणालीसह यशस्वीरित्या कार्यान्वित करुन 5 वर्षाच्या हमी कालावधीत सुट्या भागांसह सर्व समावेशक देखभाल व दुरुस्ती करणे (CMC) या कामासाठी केंद्र शासनाच्या (न.व.न.ऊ.मंत्रालय) / शासकीय निकषाप्रमाणे प्रमाणित असलेल्या सौर विद्युत संच/साधनांचे उत्पादक/टर्नकी इ.पी.सी. कंपनीज् व त्यांचे नोंदणीकृत वितरक यांच्या कडून ई-निविदा मागविण्यात येत आहे.
ई-निविदेच्या सविस्तर माहितीसाठी **www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर भेट द्यावी. प्राप्त होणाऱ्या निविदांपैकी एक किंवा सर्व निविदा स्विकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार विभागीय महाव्यवस्थापक, महाऊर्जा, अमरावती यांचे कडे राखीव राहतील.
विभागीय महाव्यवस्थापक

पूर्वोत्तर रेल्वे
ऑन लाईन खुली निविदा

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने आणि त्यांच्यासाठी CEE/प्रोजेक्ट/NER/लखनौतर्फे खालील कामासाठी ऑनलाइन (ई-निविदाकरण) द्वारे "खुली निविदा" आमंत्रित करत आहेः
कामाचे वर्णनः नॉर्दर्न रेल्वेच्या लखनौ आणि मोरादाबाद विभागातील ट्रॅक्शन सिस्टीमचे १x२५ केव्हीमधून २x२५ केव्ही ओएचए सिस्टीममध्ये श्रेणीसुधारणेच्या संबंधात, आरडीएसओ स्पष्टीकरण क्र.टीआय/एसपीसी/आरसीसी/स्काडा/०१३४ किंवा सध्याच्या स्पष्टीकरणानुसार विविध ठिकाणी स्काडा सिस्टीमची रचना, पुरवठा, उभारणी, चाचणी आणि कार्यान्वयन करणे. **ई-टेंडर क्र.** : ईएल-एनईआर-स्काडा-०२-२६, **अंदाजे मूल्यः** रु. १७,०७,८४,९६७.२६, **बोली सुरक्षा/इसारा रक्कमः** रु. ३४,१५,७००.००, **निविदा समाप्ती दिनांकः** २४.०८.२०२६, **स्वीकृती पत्र जारी केल्यापासून कामाचा पूर्तता दिनांक / कालावधीः** २४महिने.
• संपूर्ण तपशील आणि निविदा सादर करण्यासाठी कृपया भारतीय रेल्वेची वेबसाइट www.ireps.gov.in पहा. निविदा सूचनेच्या हिंदी आणि इंग्रजी आवृत्तीमध्ये काही तफावत आढळल्यास, इंग्रजी आवृत्तीच ग्राह्य धरली जाईल आणि तिचेच पालन केले जाईल.

उप मुख्य विद्युत अभियंता , प्रकल्प
सीपीआरओ/ई एल १५ एनईआर/ लखनौ

गाडीमधून ज्वालाग्राही वस्तूंसह प्रवास करू नका

CEAT
सीएट लिमिटेड
CIN : L25100MH1958PLC011041
नोंदणीकृत कार्यालय : ४६३, डॉ. ॲन्नी बेझंट रोड, वरळी, मुंबई-४०००३०
(टेलि) : +९१ २२ २४९३ ०६२१ (फॅक्स) +९१ २२ २४९३ ८९३३;
ईमेल : investors@ceat.com; वेबसाइट : www.ceat.com

अभिलेख तारखेची सूचना

सूचना याद्वारा कंपन्या (व्यवस्थापन व प्रशासन) नियम, २०१४ च्या नियम १०(१) यासह वाचलेल्या कंपन्या अधिनियम, २०१३ च्या कलम ९१ च्या तरतुदी व अन्य लागू तरतुदींच्या अनुसार देण्यात आली आहे की, नॅशनल स्टॉक एक्स्चेंज ऑफ इंडिया (एनएसई) वर सूचीबद्ध असलेले आणि खासगी स्वरूपात आधारे निर्गमित केलेल्या अपरिवर्तनीय ऋणपत्रांसंबंधित विमोचन प्रक्रिया आणि वार्षिक व्याजाचे प्रदान याखालील तपशिलानुसार हाती घेण्यात येईल :

आयएसआयएनजं	एनसीडीजचा तपशील	एनसीडीजची रक्कम (रु. कोटीत)	अभिलेख तारखा	व्याज/ विमोचन	प्रदानाच्या तारखा
INE482A08025	७.९९% सूचीबद्ध, वरिष्ठ, असुरक्षित, विमोचनीय, असंचयी, करयोग्य, अपरिवर्तनीय ऋणपत्रे	रु. १५०	०४ सप्टेंबर २०२६	व्याज व विमोचन	१८ सप्टेंबर २०२६*
INE482A08033	७.२०% सूचीबद्ध, मूल्यांकन केलेले, वरिष्ठ, असुरक्षित, करयोग्य, विमोचनीय, अपरिवर्तनीय ऋणपत्रे	रु. २५०	१५ डिसेंबर २०२६	व्याज	३० डिसेंबर २०२६

** १९ सप्टेंबर २०२६ ची मूळ प्रदान तारीख सुट्टीचा दिवस आहे, त्यामुळे प्रदान एक दिवस आधी करण्याचे नियोजित आहे. अभिलेख तारीख, तथापि, मूळ प्रदान तारखेच्या आधारे निश्चित केलेली आहे.*

सीएट लिमिटेडकरिता
(गौरव टोंगिया)
कंपनी सचिव

स्थळ : मुंबई
दिनांक : ३० जुलै २०२६

महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी
(महाराष्ट्र शासनाची नोंदणी क्र. GBBSD ४८८/२०१९ खाली नोंदणीकृत स्वायत्त संस्था व भारत सरकारमार्फत दि. २५-१०-२०१९ अन्वये मान्यताप्राप्त)
मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय
१ ला मजला, राकवियो रुग्णालय इमारत, गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई- ४०० ०१८.
दूरध्वनी क्र. (०२२) २४९५५२९८, २४९५५३१६, २४९५०८६३
ई-मेलः establish.mhesis@gmail.com

क्र.मुकाअ/महा-राकाविसो/कंत्राटी/जाहिरात/का.क्र. १/ २४३७३/२०२६ दिनांकः- २२ जुलै २०२६

जाहिरात

महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटीअंतर्गत रुग्णालये तसेच वैद्यकीय प्रशासन अधिकारी कार्यालयांसाठी सहायक लेखाधिकारी व प्रशासन अधिकारी यांची कंत्राटी पद्धतीने नियुक्ती करण्यासाठी शासकीय सेवेतून सेवानिवृत्त अधिकारी यांचेकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.
I) भरावयाची पदसंख्या :

अ.क्र.	पदाचे नाव	पदसंख्या	पदाचे ठिकाण
१	सहायक लेखाधिकारी	५ पदे	आयुक्तालय, रुग्णालय वरळी, रुग्णालय मुलुंड, रुग्णालय उल्हासनगर, वैप्रअ ठाणे.
२	प्रशासन अधिकारी	५ पदे	रुग्णालय ठाणे, रुग्णालय नाशिक, रुग्णालय छ. संभाजीनगर, वैप्रअ नाशिक, वैप्रअ अमरावती.

II) अर्हता: १. सहा. लेखाधिकारी: फक्त संचालनालय, लेखा व कोषागारे कार्यालयातून सहायक लेखाधिकारी किंवा त्यावरील पदावरून सेवानिवृत्त अधिकारी असावे. तसेच लेखाधिकारी/सहायक लेखाधिकारी पदाचा किमान ३ वर्षांचा अनुभव. (लेखाधिकारी किंवा त्यापेक्षा वरिष्ठ पदावरील अधिकाऱ्यास प्रथम प्राध्यान्य.)
२. प्रशासन अधिकारी: महाराष्ट्र शासन सेवेतून प्रशासन अधिकारी किंवा त्यावरील प्रशासकीय पदावरून सेवानिवृत्त झालेल्या अधिकारी. किमान ३ वर्षे प्रशासनिक पदाचा अनुभव.
III) वयोमर्यादा : ६५ वर्षांपर्यंत (दि. ३१.०७.२०२६ रोजी पर्यंत)
IV) नियुक्तीचा कालावधी: १ वर्ष (कामगिरी समाधानकारक असल्यास नूतनीकरण करण्यात येईल)
V) मानधन : रु. ४८,१०६/- एवढे ठोक मानधन (सर्वसमावेशक)
VI) कंत्राटी कामाचे स्वरूप :
१. सहायक लेखाधिकारी - लेखाविषयक कामाबाबत मार्गदर्शन करणे, प्रलंबित महालेखाकार, भांडार पडताळणी, अंतर्गत लेखापरीक्षण आक्षेप/परिच्छेद यांचा निपटारा करणे, सर्व प्रकारचे देयके तपासणी व लेखा परीक्षण तसेच लेखासंदर्भातील सर्व विषय हाताळणे इ.
२. प्रशासन अधिकारी- सेवाविषयक कामे, विभागीय चौकशी, कार्यालयीन खरेदी, माहिती अधिकार, वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती इत्यादीविषयीचे कामकाज.
उपरोक्त अटी व शर्तींची पूर्तता करणाऱ्या अधिकाऱ्यांनी त्यांचे अर्ज मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य कामगार विमा सोसायटी, रा.का.वि.सोसायटी रुग्णालय, १ ला मजला, गणपत जाधव मार्ग, वरळी, मुंबई- ४०००१८ (ई-मेल- establish.mhesis@gmail.com) या पत्त्यावर जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत पोहचतील अशा बेताने पाठवावेत.

सही/-
(सोहम पं. वायाळ)
संचालक (प्रशासन)
महा-राकवि सोसायटी, मुंबई.

डीजीआयपीआर/२०२६-२७/२०१५

MCXCCL
मल्टी कमॉडिटी एक्सचेंज क्लिअरिंग कॉर्पोरेशन लिमिटेड
एक्स्चेंज स्क्वेअर, सुरेन रोड, चकाला, अंधेरी (पूर्व), मुंबई - ४०० ०९३, भारत
सीआयएन: U74999MH2008PLC185349 | ई-मेल : ig-mcxccl@mcxccl.com | संकेतस्थळ: www.mcxccl.com

३० जून २०२६ रोजी संपलेल्या त्रैमासिक अलेखापरीक्षित आर्थिक निष्कर्षांचे सार
(₹ लाखांमध्ये)

तपशील	संपलेली तिमाही			संपलेले वर्ष
	३० जून, २०२६ अलेखापरीक्षित	३१ मार्च, २०२६ लेखापरीक्षित	३० जून, २०२५ अलेखापरीक्षित	३१ मार्च, २०२६ लेखापरीक्षित
१. प्रचालनातून एकूण उत्पन्न	१२,०५२	१६,४८८	७,०५१	४२,५८९
२. कालावधीकरिता निव्वळ नफा (कर, अपवादात्मक व/किंवा असाधारणबाबींपूर्वी)	८,५९१	१३,६०२	४,६९३	३२,०७९
३. कालावधीकरिता करापूर्वीचा निव्वळ नफा (अपवादात्मक व/किंवा असाधारणबाबींनंतर)	८,५९१	१३,६०२	४,६९३	३२,०७९
४. कालावधीकरिता करानंतरचा निव्वळ नफा (अपवादात्मक व/किंवा असाधारणबाबींनंतर)	८,५९१	१२,२५९	४,६९३	३०,७४२
५. कालावधीकरिता एकूण व्यापक उत्पन्न [(कालावधीकरिता सर्वसमावेशक नफा (करानंतर) आणि इतर व्यापक उत्पन्न (करानंतर)]	८,५६३	१२,२७६	४,६६३	३०,७४४
६. समभाग भांडवल (₹१०/- प्रति शेअर)	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०	२३,९९८.५०
७. राखीव (पुनर्मूल्यांकन निधी वगळून मागील वर्षाच्या लेखापरीक्षित ताळेबंदात दर्शविल्यानुसार)	-	-	-	३,३५८
८. प्रत्येक समभागाचे उत्पन्न (₹१०/- प्रत्येकी)* मूलभूत आणि सौमिकृत (₹):	३.५८	५.११	१.९६	१२.८१

** अंतरिम कालावधीसाठी प्रति समभाग उत्पन्न वार्षिकीकृत नाही.*

नोंद:
१. वरील तक्ता त्रैमासिक वित्तीय निष्कर्षांचे सार आहे. त्रैमासिक वित्तीय निष्कर्षांचे पूर्ण स्वरूप कंपनीचे संकेतस्थळ www.mcxccl.com वर उपलब्ध आहे.
२. वरील निकालांचे लेखापरीक्षण समितीने पुनरावलोकन केले असून, संचालक मंडळाने ३० जुलै २०२६ रोजी झालेल्या त्यांच्या बैठकीत त्यास मान्यता दिली आहे.

संपूर्ण वित्तीय निष्कर्ष पाहण्यासाठी क्युआर कोड स्कॅन करा
किंवा: https://www.mcxccl.com/disclosures ला भेट द्या.

स्थळ: